# मुंबई विद्यापीठ

गुण व प्रमाणपत्र कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / गुण व प्रमाणपत्र कक्ष/928 /२०१९

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक आपणास ज्ञातच आहे की, देशाच्या मानव संसाधन विकास विभाग व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी राष्ट्रीय शैक्षणिक निक्षेपागार (National Academic Depository ) या Digital Portal ची सुरूवात केलेली आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक अभिलेख Online प्राप्त करून देणे व देशातील तसेच विदेशातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांना त्यांच्याकडे कार्यरत असलेले कर्मचारी वर्गाचे शैक्षणिक अभिलेखाची पडताळणी Online स्वरूपात शिघ्र गतीने उपलब्ध करून देणे हा या Portal सुरू करण्यामागचा उद्देश आहे.

मानव संसाधन विकास विभाग व विद्यापीठ अनुदान आयोग यांनी उपरोक्तप्रमाणेचे Portal चालवणे कामी National Securities Depository Limited (NSDL), Mumbai. या अभिकरणाची (Agency) नियुक्ती केलेली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या निर्देशाप्रमाणे, विद्यापीठात नोंदणी असलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती उपरोक्त Portal वर उपलब्ध करून देणेकामी NSDL Database Management Limited, Mumbai. या अभिकरणाशी विद्यापीठाने करार केलेला आहे.

या सुविधेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने स्वतःला National Academic Depository Portal वर नोंदणी करून घेणे हे अनिवार्य आहे; या करिता National Securities Depository Limited, Mumbai या अभिकरणाने विद्यापीठाच्या www.mu.ac.in अधिकृत संकेतस्थळावर मुख्य पृष्ठावर (Home Page) Scrolling मध्ये Online NAD Registration... या सदराखाली एक Link उपलब्ध करून दिलेली आहे.

# मुंबई विद्यापीठ

तरी, आपणा सर्वांना सविनय कळविण्यात येते की, आपल्या शैक्षणिक विभागात/महाविद्यालयात/संस्थेत शिक्षण घेत असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त नमुद संकेतस्थळाला भेट देऊन उपरोक्त Portal वर स्वत:ची नोंदणी करून घेण्याबाबत अवगत करण्यात यावे.

तसेच पुढे असेही कळविण्यात येते की, National Securities Depository Limited, Mumbai, चे प्रतीनिधी उपरोक्तप्रमाणे नोंदणी करण्याबाबतीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनकरण्यासाठी विभागात/महाविद्यालयात/संस्थेत भेटी देणार आहेत, तरी त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे ही नम्र विनंती.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१९

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपकेंद्रांचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, मुंबई विद्यापीठ
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. संचालक, नॅशनल सेक्युरिटीज् डिपोझिटरी लिमिटेड, मुंबई

ड. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक